Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 886 – 890
DOI: 10.5281/zenodo.10282338

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे महिलाविषयक विचार

प्रा. डॉ. रजनी अनंतराव बोरोळे

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय हाडोळती ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: drrajaniborole@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

महिलांना समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या बरोबरीची वागणूक मिळाली पाहिजे, यासाठी वेगवेगळे कायदे केलेले आहेत. तरीही महिलांवर अन्याय, अत्याचार होतात. स्त्रियांच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचवली जात आहे. आजही राजकीय पक्षाच्या अंतर्गत रचनेत महिलांना योग्य प्रतिनिधित्व दिले जात नाही. निवडणूक तिकीट वाटपातही महिलांवर बऱ्याच वेळा अन्याय होतो. महिलांचे संसदेतील प्रमाण खूप कमी आहे. ऑफिसमध्ये पुरुषप्रधान मानसिकतेचे पुरुष महिलांना बऱ्याच वेळा वेगवेगळ्या निमित्ताने अपमानित करतात व गौण लेखतात. कुटुंबामध्ये महिलांवर अन्याय, अत्याचार होत आहेत. महिलांचा छळ सर्वत्र पहावयाला मिळतो आहे. अशा परिस्थितीमध्ये महात्मा गांधींच्या महिलाविषयक विचाराची आजही प्रस्तुतता, आवश्यकता आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये गांधीजीच्या महिला विषयक विचाराची मांडणी केलेली आहे.

**प्रमुख संज्ञा:** पुरुषप्रधानता, शोषण, समानता, आत्मसन्मान, सत्याग्रह, पडदापद्धती, हुंडापद्धती, विधवाविवाह, राजकीय स्वातंत्र्य, स्वदेशी, अहिंसा, सविनय कायदेभंग.

## उद्दिष्टे

१. महिलाविषयक आजची वास्तविकता तपासणे.

२. ग्राम, देश समाजासाठी महिलांचे योगदान अभ्यासणे.

३. महात्मा गांधीजींचे स्त्री पुरुष समानता विषयक विचार अभ्यासणे.

४. महात्मा गांधीजींचे हुंडापद्धती, पडदापद्धती व शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.

**गृहीतके**

१. आजही महिलांना अनेक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळत नाही.

२. महात्मा गांधीजी महिलांना समाज जीवनाचा आवश्यक भाग मानतात.

३. महात्मा गांधी महिलांच्या विकासासाठी अनेक वाईट प्रथांना विरोध करतात.

४. महात्मा गांधी महिलांच्या शिक्षणाचा व तिच्या हक्काचा पुरस्कार करतात.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंध द्वितीयक तथ्यावर आधारलेला असून त्यासाठी संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे इत्यादीचा आधार घेतलेला आहे.

गांधीजी महिलांना समाजव्यवस्थेत पुरुषांच्या बरोबरीने महत्त्वाचे स्थान देतात. त्यांच्या मते स्त्री व पुरुष मिळूनच ईश्वराने समाज निर्माण केलेला आहे. गांधीजी स्वतःमधील चांगल्या गुणांचे श्रेय आईला देतात. ते म्हणतात, मी जर स्त्री असतो तर पुरुषांच्या हातातील खेळणे बनण्यास विरोध केला असता. त्यांच्या मते ईश्वराने स्त्रियांना मोठी नैतिक शक्ती दिलेली आहे. याबाबतीत महिला पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे. ते म्हणतात, "आपल्या देशात अर्ध्याहून अधिक संख्या स्त्रियांची आहे. त्यांची जोपर्यंत पायमल्ली होत आहे तोपर्यंत हा देश कधीही समृद्ध होऊ शकणार नाही. म्हणून ज्यांना या देशाच्या समृद्धीचा ध्यास लागला आहे, त्यांना गांधीजी सांगतात, आपल्या जीवनात प्रत्येक कार्यात व प्रत्येक प्रसंगी स्त्रियांना जितके आपल्याबरोबर ठेवता येईल, तितके ठेवा."[1]

महात्मा गांधीजी स्त्री पुरुष समानतेचे पुरस्करते होते. कायद्याने पुरुषाला मिळणारे सर्व हक्क महिलांना मिळाले पाहिजेत. मालमत्ता आणि शिक्षणाबाबत महिलांना समान हक्क मिळाले पाहिजेत, याबाबत गांधीजी आग्रही होते. "ज्या महिला पारंपारिक वाईट संस्कारातून मुक्त झाले आहेत आणि ज्यांना अन्यायाची जाणीव झाली आहे, त्यांनी सुधारणेच्या विधायक कार्यासाठी पुढे आले पाहिजे. स्त्रियांचे स्वातंत्र्य, हिंदुस्थानचे स्वातंत्र्य, अस्पृश्यता निवारण, बहुजन समाजाच्या आर्थिक स्थितीचे निवारण हे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी खेड्यात गेले पाहिजे आणि तेथील जीवन सुधारण्याच्या उद्योगाला लागले पाहिजे."[2] महात्मा गांधीजीचे महिलांच्या विवाह संदर्भातील विचार सखोल, वैशिष्ट्यपूर्ण होते. ते म्हणतात जनसेवा करण्यासाठी मुलींनी अविवाहित राहणे आवश्यक आहे. देशसेवा, समाजसेवेचे ध्येय बाळगलेल्या मुली अविवाहित राहणे चांगले आहे. परंतु त्यावेळी विवाहही आयुष्यातील एक स्वाभाविक गोष्ट आहे. त्यामुळे विवाहाला कमी लेखू नये. विवाह हा एक पवित्र संस्कार म्हणून आपले वैवाहिक जीवन संयमाने जगणे हे आपले ध्येय असले पाहिजे. विवाह संदर्भात मुला मुलीची परस्पर सहमती महत्त्वाची आहे. विवाह संस्कार शारीरिक सुखाबरोबरच वंशसातत्य यासाठी महत्त्वाचा आहे. ते बालविवाहाला विरोध करतात. कुटुंबामध्ये महिलांना स्वयम निर्णय घेता आला पाहिजे. पती-पत्नीने एकमेकांवर मत लादू नयेत. जमत नसेल तर परस्परांपासून पती-पत्नीने दूर राहिले तरी चालेल, असे त्यांचे

मत होते. आजच्या परिस्थितीत घटस्फोटाचे, वैवाहिक संघर्षाचे प्रमाण वाढलेले आहे. अशा परिस्थितीत महात्मा गांधीचे विवाह विषयक विचार महत्त्वाचे वाटतात.

महात्मा गांधी महिलांच्या राजकीय सहभागाबाबत सकारात्मक आशावादी होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महिला मोलाची भूमिका बजावू शकतात, असा गांधीजींना विश्वास होता. महात्मा गांधीनी स्त्रियांचा सत्याग्रहातील सहभाग वाढवलेला होता. विशेषतः असहकार, सत्याग्रह, सविनय कायदेभंगाची चळवळ इत्यादी संदर्भात महिलांना त्यांनी सक्रिय सहकारी करून घेतले होते. गांधीजींनी पुकारलेल्या चळवळीत प्रथमच महिलांची संख्या प्रचंड होती. परदेशी कापडाची होळी करण्याच्या कार्यक्रमात त्यांनी महिलांना प्राधान्य दिले. जेणेकरून महिलांना रोजगार मिळेल. दारूबंदीच्या चळवळीतही महिला आघाडीवर असाव्यात असे त्यांचे मत होते. महात्मा गांधी महिलांना अहिंसात्मक लढण्यासाठी आवश्यक असल्याचे म्हणतात. या लढ्यासाठी महिला अधिक योग्य आहेत असे त्यांना वाटते. महात्मा गांधींच्या मते महिला अहिंसेची मूर्ती आहेत. अहिंसेचा अर्थ दुःख सहन करण्यासाठी मोठी क्षमता आहे. आज हीच शक्ती स्त्रियांचे सामर्थ्य होय, असे महात्मा गांधींना वाटते. अहिंसेच्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी पुरुषापेक्षा महिला कितीतरी पटीने अधिक योग्य आहेत, असे गांधीजींना वाटत होते. म्हणूनच ते स्त्रियांना राजकीय कार्यामध्ये सुद्धा सहभागी करून घेतात. ते म्हणतात, अहिंसा हेच काँग्रेसचे धोरण असावे आणि त्यासाठी महिला सक्रिय सहभागी झाल्या पाहिजे, ते त्यांच्या जवळच्या अहिंसात्मक तत्त्वामुळेच. गांधीजी त्यांना देशसेवेच्या कार्यात सहभागी होण्याचा सल्ला देतात. "महात्मा गांधीजी म्हणतात, योग्य लायकी असलेल्या कार्यकर्त्या स्त्रिया पुरेशा संख्येने पुढे येत नाहीत, ही दुःखाची गोष्ट आहे. याचा दोष पुरुष वर्गाकडे आहे. कारण त्याने स्त्री जातीला प्रपंचाच्या रगाड्यात डांबून ठेवले आहे. पुरुषांनीच त्यांना त्यातून बाहेर काढले पाहिजे व पुढे आणले पाहिजे."[3] म्हणजे महिलांच्या सामाजिक व राजकीय कार्यातील सहभाग वाढविण्याची जबाबदारी पुरुषावर सोपवितात. महात्मा गांधी म्हणतात की, महिलांना राजकीय स्वातंत्र्य दिले की, त्यांच्याशी संबंधित संपूर्ण समस्या आपोआप संपुष्टात येतील. स्वदेशी चळवळीत जास्त सहभाग महिलांचा असला पाहिजे. स्वदेशी म्हणजे सर्व प्रश्न सोडविणारी कामधेनू आहे. महिला घरातच विणकाम, सूतकताईचे काम करू शकतात. ते म्हणतात की, स्त्रियाशिवाय स्वदेशी पालन केलेच जाऊ शकत नाहीत. अशाप्रकारे स्वदेशीचे तत्व अंगीकारताना स्त्रियांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे स्पष्ट केले आहे.

महिलांच्या शिक्षणाबाबत गांधीजीचे विचार उदारमतवादी, प्रगल्भ असलेले दिसतात. ते म्हणतात की, जीवनात पुरुषांच्या बरोबरीने महिलांना सहभागी होता येईल असे शिक्षण महिलांना दिले जावे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी तिच्या दर्जा व जीवनमानासाठी शिक्षण आवश्यक आहे, अशी त्यांची धारणा होती. ते म्हणतात की, ज्यांना शाळा कॉलेजात शिक्षण मिळाले नाही अशा महिलांनी लग्नानंतरही शक्य तेवढे शिक्षण घ्यावे. स्त्रियांना शिक्षणासाठी सवलती हव्या असतील तर त्या त्यांनी सवलती घ्याव्यात, असे गांधीजींचे मत होते. महिलांच्या शिक्षणाबाबत ते म्हणतात की, ज्या महिलांनी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतलेले आहे, अशा महिलांनी देशातील महिलांच्या शिक्षणासाठी पुढाकार घ्यावा. कार्य करावे. ते म्हणतात, "स्त्रियांना वागताना पुरुषांनी सत्याकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही.

महिलांना मित्र मानण्याऐवजी तिला दासी मानली. महिलांना स्वतःच्या जीवनात पुरुषांच्या बरोबरीने जबाबदारी पूर्ण करू शकतील असे शिक्षण द्यावे."[4]

गांधीजी म्हणतात स्त्रीला दासी न मानता मित्र मानावे. स्त्री ही उपभोग्य वस्तू नसून पुरुषांच्या जीवनकार्यातील सहकारी आहे. पुरुषाप्रमाणे स्त्रियांना सुद्धा समान सक्रिय सहभागाचा हक्क आहे. त्यांना स्वातंत्र्याबाबतीतही पुरुषांच्या बरोबरीने हक्क आहेत. गांधीजींच्या मते स्त्री स्वातंत्र्याचा मार्ग त्यांना केवळ शिक्षण देणे हा नाही तर पुरुषवर्गाचा त्याच्याविषयीचा दृष्टिकोन बदलविणे व त्यानंतर आचरणात बदल करणे हा आहे. "पोशाखाबाबत स्त्रियांनी पाश्चिमात्याचे अंधानुकरण करू नये, असे गांधींना वाटायचे. परंतु त्याचबरोबर स्त्रियांसाठी पडदापद्धती योग्य नाही, याचे आरोग्यावर घातक परिणाम होतात असे गांधींनी आपल्या 1917 मध्ये बिहार मधील प्रवासादरम्यान चर्चा करताना विचार मांडले. पडदापद्धतीमुळे स्त्रियांमध्ये संकुचित वृत्ती राहते तसेच सूर्यप्रकाश व शुद्ध हवा शरीर स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक बाब आहे. कारण जो पडदा पाळतो, तो मनात ठेवावा. पडद्याचा अर्थ लज्जा, मर्यादा व सभ्यता परंतु बाहेर दाखविण्यासाठी पडदा ठेवला आणि मन मलिन ठेवले तर पडद्याचा काय उपयोग असे गांधी म्हणतात."[5]

महात्मा गांधीजी सती प्रथेलाही विरोध करतात. एकप्रकारे पतीशिवाय पत्नीला जगण्याचा अधिकार आहे, हे महात्मा गांधी अधोरेखित करतात. ते म्हणतात की, मुलाप्रमाणे मुलीलाही वारसा हक्क मिळाला पाहिजे. कारण निसर्गनियमाप्रमाणे दोघेही समान आहेत. त्यामुळे महिलांना मालमत्तेचे स्वामित्व मिळाले पाहिजे. एकप्रकारे स्त्रियांच्या आर्थिक अधिकाराचा ते आग्रह धरतात. ते म्हणतात की, पतीची संपत्ती ही पती-पत्नीची संयुक्त मालमत्ता आहे. एकूणच महिलांचे कुटुंबातील स्थान उंचावण्यासाठी ते तिच्या आर्थिक सबलीकरणाचा प्रयत्न करतात.

ते म्हणतात स्त्रियांनी आपल्या शीलाचे संरक्षण केले पाहिजे. जर एखाद्या महिलेवर हल्ला झाला तर तिने अहिंसेचा विचार करू नये. आपल्या शीलाचे संरक्षण करणे हे तिचे पहिले कर्तव्य आहे. यासाठी तिला जे मार्ग किंवा उपाय सुचतील त्याचा तिने वापर करावा.

**निष्कर्ष**

आजच्या आधुनिक काळातही महिलांवर काही प्रमाणात अन्याय, अत्याचार होत आहेत. अशा परिस्थितीमध्ये आजही गांधी विचार उपयुक्त आहेत. अनेक क्षेत्रात महिलांना आजही पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले जात नाही, हे वास्तव आहे. गांधीजी महिलांच्या सर्वांगीण विकासाचे विचार मांडतात. त्यांनी हुंडा प्रथा, सती प्रथांना विरोध करून महिलांच्या शिक्षणाचा, विधवांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार केला आहे. त्यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा विचार केला आहे. महिलांच्या समतेकडे लक्ष दिलेले आहे. आजही जे स्वातंत्र्य महिलांना आजचा समाज देऊ शकला नाही, त्या स्वातंत्र्याची कल्पना महात्मा गांधीजींनी केलेली होती. आर्थिक, राजकीयदृष्ट्या महिलांना सक्षम करण्याच्या दृष्टीने त्यांचे विचार मोलाचे आहेत.

**संदर्भ सूची**

१. उपाध्याय हरिभाऊ, बापू कथा, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, सहावी आवृत्ती 1996, पृ. 217.

२. शिखरे दा. न., स्त्री - जीवन, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती 1994, पृ. 5.

३. चाफेकर सुधा, अनुवादक, मोहन माला, सर्वोदय मंडळ, मुंबई, 1994, पृ. 110.

४. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नातील भारत, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2009.

५. गांधी मोहनदास करमचंद, अनुवादक, सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन, सत्याचे प्रयोगात व आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, 1997, पृ. 11.

६. गांधी विचार दर्शन (सत्याग्रहाचे प्रयोग), भारदे बाळासाहेब, अध्यक्ष महात्मा गांधी स्मारक निधी, पुणे, 1995.